पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in ✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 3590

दिनांक :
Date : 9 DEC 2022

# परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाचा १८ वा दीक्षांत समारंभ दि. १२ डिसेंबर, २०२२ रोजी संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सुवर्णपदक आणि पीएच.डी पदवी प्राप्त स्नातक तसेच मार्च -२०२२ पूर्वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेले आहेत. व जे विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे सदरील दीक्षांत समारंभात वाटप करण्यात येणार आहेत, जे विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र घेवून जाणार नाहीत, त्यांची पदवी प्रमाणपत्रे टपालाद्वारे (जलद टपाल/कुरियर) वितरीत करण्यात येणार आहेत.

परंतू मार्च- २०२२ च्या अंतिम सत्राच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व पदवी प्रमाणपत्राचे शुल्क संबंधीत महाविद्यालयात जमा केलेल्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे संबंधीत महाविद्यालयातून माहे फेब्रुवारी/मार्च २०२३ दरम्यान संबंधीत विद्यार्थ्यांला मिळतील. त्यामुळे मार्च- २०२२ मध्ये उत्तीर्ण असलेल्या व महाविद्यालयात शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांनी दि. १२ डिसेंबर, २०२२ रोजी संपन्न होणाऱ्या दीक्षांत कार्यक्रमास पदवी,पदविका प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित राहवू नये. सदरील स्नातकांनी कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित न राहता ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रमास उपस्थित रहावे, ऑनलाईन कार्यक्रमाची लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.
कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. एस.एस.गणपूर)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी :-

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ विद्यापीठ संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सर्व विद्यार्थ्यांना व संबंधितांना सदरचे परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.